# प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

## हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

(०२३५८) २८२३८७

अंक ३४/२०१८ | दिनांक २७/०४/२०१८ | कालावधी ५ दिवस


| डॉ. सुभाष चव्हाण, | डॉ. विजय मोरे, | प्रा. विरेश चव्हाण, |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४२२३७४००१ | ९४२२०६५३४४ |


| मागील हवामान आठवडा सारांश दि. २३/०४/२०१८ ते २७/०४/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ०.० |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | ०.० |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | २८३४.२ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२.६–३७.० |
| किमान तापमान (अं.से) | : | २२.६–२७.८ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ७६–८२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ५७–६८ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ३.३–५.० |

| हवामान पूर्वानुमान (२८/०४/२०१८ सकाळी ८:३० पासून ०२/०५/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| हवामानाचे घटक | : | २८/०४ | २९/०४ | ३०/०४ | ०१/०५ | ०२/०५ |
| पाऊस (मिमी) | : | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३६ | ३७ | ३८ | ३७ | ३८ |
| किमान तापमान (अं.से) | : | २४ | २४ | २४ | २४ | २४ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ० | ० | ० | ० | ० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ९३ | ९३ | ९१ | ९५ | ९१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | २९ | २५ | २२ | २५ | २० |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ००२ | ००२ | ००२ | ००२ | ००२ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक २८ एप्रिल ते २ मे, २०१८ पर्यंत अवकाश स्वच्छ सुर्यप्रकाशित राहिल. दिनांक २८ एप्रिल ते २ मे, २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग २ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| कडधान्य पिके | काढणी | • तयार झालेल्या कडधान्य पिकांची सकाळी आणि संध्याकाळी काढणी करून उन्हात व्यवस्थित वाळवावे. वाळलेली पिकांची संरक्षित ठिकाणी साठवण करावी. |
| चिकू | फळधारणा | • चिकूवरील फळगळ या रोगाच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये (मेटालॅक्झिल ८ टक्के + मॅन्कोझेब ६४ टक्के) या संयुक्त बुरशीनाशकाचे ०.२ टक्के (२० ग्रॅम/१० लिटर पाणी) द्रावण संपूर्ण झाडावर फवारावे.<br>• मोठया आकाराची काढणीची फळे तयार झाली असून ती काढणीच्या अवस्थेत आहेत. तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर अतूल चिकू झेल्याच्या सहाय्याने काढावीत.<br>• वाढते तापमान व सापेक्ष आर्दतेत होणाऱ्या बदलामुळे पाण्याच्या उपलब्धतेनुसार चिकू बागेमध्ये पाण्याचे योग्य व्यवस्थापन करावे. |
| नारळ/ सुपारी | –– | • सरासरी तापमानात वाढ झाल्यामुळे नारळाच्या बागेला ५ ते ६ दिवसांनी आणि सुपारी बागेला ४ ते ५ दिवसांच्या अंतराने पाणी दयावे.<br>• नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| भाजीपाला लागवड | फळधारणा | • भाजीपाला (वांगी, टोमॅटो, मिरची व नवलकोल) पिकांमध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनझोल ५ मिली किंवा ८० टक्के पाण्यात मिसळणारी गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकामध्ये फळमाशीच्या नियंत्रणासाठी प्रति हेक्टर ४ रक्षक सापळे लावावेत. |
| दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे उष्णतेपासून योग्यते संरक्षण करावे. गोठयामध्ये व शेडमध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे.<br>• दिवसाचे कमाल तापमान वाढत असल्याने कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करावे. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |